# प्राजक्त

संस्थापक व आद्य संस्थापक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

वर्ष : ४२ अंक : फोन : ०२३१-२५४०४२७

कोल्हापूर ता. मार्च ३१, २०१३ किंमत २ रुपये

Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur



आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खासगी वितरण)

अंक १५ वा एप्रिल २०१३
वर्ष तिसरे, त्रैमासिक क्र. १

Website : www.bhidekul.in
Email: office@bhidekul.in


## संपादकीय




सातान्यातील भिडे कुल बंधु/भगिनी/माहेरवाशिणींनी अफाट उत्साह, उत्कृष्ट नियोजन व आयोजन आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करून २०१३ जानेवारी मध्ये झालेले भिडे संमेलन यशस्वी करून दाखविले. त्यामध्ये सर्वश्री प्रशांत व सौ. सुप्रिया, ॲड. दामोदर, डॉ. मोरेश्वर, श्री. दत्ता भिडे, श्री. माधव, महेश, उल्हास, अरुण, सौ. सुमनताई, सौ. प्राची, श्री. वरद, श्री. नचिकेत, सौ. प्राजक्ता, श्री. शेखर व सौ. नीता, श्री. विनायक इत्यादी भिडे मंडळींचे खूप मोलाचे सहकार्य लाभले. संमेलनाचे ठिकाण प्रशस्त व हिरवळीने नटलेले असल्याने एक वेगळाच आनंद मिळाला.

या संमेलनाचा महत्त्वाचा दुवा किंवा समन्वायक श्री. माधव वासुदेव आणि ले. क. सुनील भिडे व प्रतिष्ठानचे कार्यकारिणी सदस्य सर्व पदाधिकारी तसेच सातारा स्थित इतर सर्व भिडे बंधू-भगिनी यांनी केलेले सहकार्य वाखाणण्यासारखेच आहे.


खरंतर संमेलन म्हणजे आपल्या घरातील कार्यच असते हे कोणा एकाचे काम नसून हे सांघिक काम आहे. सातारा सम्मेलनातील भोजन, नाश्ता, चहा, निवास व्यवस्था या बाबी प्रामुख्याने उच्च दर्जाच्याच होत्या. या शिवाय कास तलावाची चित्रफीत, सातारा कुलबंधू-भगिनी व माहेरवाशिणींचा गाण्यांचा बहारदार कार्यक्रम, श्री. सतिष भिडे यांचे गीत गायन, सौ. सुमन भिडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेल्या महिलांच्या खेळांच्या कार्यक्रमाने सर्वाधिक रंगत वाढली. जमा-खर्चाचा समतोल सांभाळून प्रतिष्ठानला आर्थिक तोशीस न देता देणगी, जाहिराती वगैरे माध्यमांद्वारे मदत केली, हे सर्व म्हणजे आगामी संमेलन आयोजन आणि नियोजना करिता एक उत्तम उदाहरण म्हणून त्याची नोंद झाली आहे. सातान्यामध्ये जवळजवळ ३५ ते ४० भिडे कुटुंबे आहेत ही सर्व कुटुंबे या संमेलनामुळे एकत्र झाली. अशी अनेक भिडे कुटुंबे एकत्र झाली तर आपण खूप काही करू शकतो. असो ! सरतेशेवटी हे संमेलन यशस्वी करण्याकरिता मदत करणाऱ्यांचे आभार न मानता त्यांची प्रशंसा करून धन्यवाद देतो आणि थांबतो !













# भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### एप्रिल

१) श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा – – – १
२) सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे – – – – – – – १
३) श्री. महेश मधुसूदन भिडे, अलिबाग – – – २
४) सौ. रोहिणी विद्याकर भिडे – – – – – – – ७
५) कु. भूषण राजाराम भिडे, अलिबाग – – १५
६) श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली – – – १७
७) श्री. संजय शंकर भिडे, मुंबई – – – – – – १७
८) श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे – – – – २०
९) कु. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा – – – – – –२३
१०) श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे – – – २४
११) चि. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी – – २४
१२) सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे – –२५
१३) श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे – – –२६
१४) श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली – २७
१५) कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली – – – २८
१६) कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली – – – २८
१७) सौ. कीर्ती प्रशांत भिडे, पुणे – – – – २८
१८) श्री. विश्वनाथ शंकर भिडे, पुणे – – – – २९

### मे

१) श्री. अरविंद नरहरि भिडे, पुणे – – – –३
२) सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे – – – – ५
३) श्री. शरद हरि भिडे, पुणे – – – – – ११
४) श्री. राजेश शरद भिडे, पुणे – – – – ११
५) कु. मैत्रेयी सुहास भिडे, पुणे – – – – १३
६) सौ. पूनम अमित भिडे, पुणे – – – – १३
७) श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे – – – १७
८) सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल – – १९
९) श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे – – –२२
१०) कु. सदिच्छा सतीश भिडे, मुंबई – – –२३
११) कु. ओम चंदन भिडे, पुणे – – – – – २४
१२) सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली – – २५
१३) श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे – – –२६
१४) सौ. मंगला प्रदीप कुलकर्णी, भांडुप – २७
१५) कु. अपूर्व राजेन्द्र भिडे, डोंबिवली – – २७
१६) श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगाव – –२९
१७) सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे – – २९
१८) श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे – – – २९
१९) श्री. विनयकुमार भिडे, बंगलोर – – – २९

### जून

१) सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे – – – – – १
२) सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे – – – –१
३) कु. अमृता चंदन भिडे, पुणे – – – – – ५
४) सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे – – – – –६
५) कमल बाळकृष्ण देवधर, गिरगांव – – १४
६) सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे – – २०
७) श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव – २०
८) सौ. सुनीति विवेक भागवत, नाशिक – २१
९) सौ. मोहिनी अविनाश भिडे, पुणे – – २३
१०) श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल – – २९
११) सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर – २९

**मदतीचा हात हवा** 'आम्ही भिडे' अंकाकरिता पुण्यातून मराठी डी.टी.पी. किंवा संपादन विभागामध्ये सक्रीय मदत करू इच्छिणाऱ्यांनी संपर्क करावा. दिलीप भिडे - ९६५७५४१२३६, ले. क. सुनील भिडे - ९६२३०१७४४४, विनायक भिडे - ९५५२२१६९६७

## जानेवारी ते मार्च २०१३ देणगीदार यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १) श्री. माधव नारायण भिडे, नाशिक | रु. | ९००/- - - | सभासद वर्गणी |
| २) श्री. माधव नारायण भिडे, नाशिक | रु. | १,२००/- - - - - - - | देणगी |
| ३) श्री. रवीन्द्र रावजी भिडे, कल्याण | रु. | १५,०००/- - - | पुरस्काराकरिता |
| ४) श्री. विद्याधर वसंत भिडे, पुणे | रु. | ५,०००/- - - - - | हितचिंतक |
| ५) श्रीमती सुमती भिडे, पुणे | रु. | ५,०००/- - - - - | हितचिंतक |
| ६) श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली | रु. | ११,०००/- - - | पुरस्कारासाठी |
| ७) श्रीमती शशिताई घुले, पुणे | रु. | १०,०००/- - - - - | आश्रयदाता |
| ८) श्री. रा. म. भिडे, पुणे | रु. | १०,०००/- | पुरस्कारासाठी |
| ९) श्री. सुभाष बळवंत भिडे, कल्याण | रु. | ९००/- - - | सभासद वर्गणी |
| १०) कु. कुमुदिनी स. भिडे, कल्याण | रु. | ९००/- - - | सभासद वर्गणी |
| ११) श्री. पांडुरंग केशवराव भिडे, पुणे | रु. | ५००/- - - - - - - | देणगी |
| १२) श्री. यशवंत केशवराव भिडे, पुणे | रु. | ५००/- - - - - - - | देणगी |
| १३) सौ. अंजली अ. गोडबोले, सातारा | रु. | १,०००/- - - - - - | देणगी |
| १४) श्री. ओंकार श्री. भिडे, डोंबिवली | रु. | १,००१/- - | सभासद वर्गणी |
| १५) श्री. प्रसाद रमेश भिडे, पुणे | रु. | ९००/- - | सभासद वर्गणी |
| १६) श्री. दिलीप रघुनाथ भिडे, मुंबई | रु. | ५०१/- - - - - - - | देणगी |
| १७) श्री. तुषार(अनंत) भिडे, चिपळूण | रु. | १०००/- - - - - - - | देणगी |
| १८) डॉ. सौ. गीता सुहासचंद्र भिडे, पुणे | रु. | १०००/- - - - - - - | देणगी |
| १९) श्री. प्रसन्नकुमार मोरेश्वर भिडे, पुणे | रु. | १०,०००/- - - - - - - | देणगी |
| २०) सौ. नलिनी वि. करंदीकर, पुणे | रु. | ५००/- - - - - - - | देणगी |
| २१) सौ. आशा सु. दांडेकर, सातारा | रु. | ५००/- - - - - - - | देणगी |
| २२) श्रीमती हेमलता प्र. जोशी, सातारा | रु. | ५००/- - - - - - - | देणगी |
| २३) सौ. विमल राजाराम भिडे, मुंबई | रु. | ५०१/- - - - - - - | देणगी |
| २४) श्रीमती सुधाताई भिडे, पुणे | रु. | १००/- - - - - - - | देणगी |
| २५) श्री. चंद्रकांत शंकर भिडे, | रु. | १०,०००/- - - - | आश्रयदाता |
| २६) श्री. प्रशांत जी. भिडे, मुंबई | रु. | ५,०००/- - - - | हितचिंतक |


**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

❖ पुणे कार्यालय : ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.-ऑप. हौसिंग सोसायटी, मंडई गणपती जवळ, पुणे – ४११ ००२

फोन : दिलीप भिडे ९६५७५४१२३६

❖ पत्रव्यवहारासाठी पत्ता ❖

विनायक वि. भिडे

५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ, भिडे वाडा, पुणे ४११ ०३०.

फोन – २४४५३२७४ मोबा : ९५५२२ १६९६७



आम्ही भिडे (अंक १५ वा)

संपादक मंडळ

**संपादक –** श्री. शशिकुमार केशव भिडे.

**कार्यकारी संपादक –** श्री. प्रभाकर भिडे,

**संपादक मंडळ –** श्री. दिलीप भिडे,
श्री. विद्याकर भिडे. श्री. चिंतामणी भिडे,
श्री. श. ह. भिडे, सौ. योगिनी भिडे, सौ. प्रिया भिडे
श्री. नरेन्द्र (विलास) भिडे,
ले. क. श्री. सुनील वा. भिडे

**सल्लागार मंडळ –**
श्री. सुनील भिडे (अभिरुची), श्री. के. मो. भिडे
श्रीमती शशिताई घुले.

**अक्षर जुळणी –** श्री. विनायक भिडे (पुणे)

# भिडे संमेलन - एक आनंदोत्सव १२/१३ जानेवारी २०१३

प्रभाकर शंकर भिडे(डोंबिवली)
मो. ९८९२५६३१५४

या वर्षीचे भिडे संमेलन सातारा येथे १२/१३ जानेवारी २०१३ ला संपन्न झाले. सातारा ही मराठी राज्याची (एकेकाळची) राजधानी. तसेच शिवप्रभूंच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली संत रामदासस्वामींच्या सज्जनगडावरील वास्तव्याने या भूमीला पावित्र्य आले आहे. या संमेलनाच्या तयारीच्या निमित्ताने बैठकीला सातार्‍यातील सर्व भिडे कुटुंबे एकत्र आली होती. सातार्‍याला भिड्यांची सुमारे तीस कुटुंबे राहतात. या निमित्ताने त्यांच्यात ओळख आणि उत्साह निर्माण झाला. आम्ही प्रतिष्ठानचे पदाधिकारी संमेलनाच्या पूर्व संध्येला म्हणजे १५ दिवस आधी तयारी बघायला गेलो होतो तेव्हा भिडे बंधू-भगिनींची आपुलकी, आनंद व संमेलनस्थळ बघून ते यशस्वी होण्याची खात्रीच पटली.



संमेलन १२ जानेवारी संध्याकाळी ५ वाजता सुरू होणार होते. साहजिकच दुपारपासून भिडे कुटुंबे येण्यास सुरुवात झाली. ४ वाजता स्वागतकक्षामध्ये सर्वांचे स्वागत करून नावनोंदणी केली. सातार्‍याची हवाही थंड उबदार व लोकांचा उत्साह वाढविणारी होती. सगळ्यांचे चहापान झाल्यावर सातार्‍यातील भगिनी सौ. सुप्रिया भिडे हिने कार्यक्रमाचे सूत्र संचालन हातात घेतले. नऊवारी साडी व प्रसन्न व्यक्तिमत्व त्यामुळे जुन्या काळाची आठवण होत होती. भिडे संमेलनाचे अध्यक्ष सातारा निवासी श्री. दत्तात्रय भिडे तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष माधवराव भिडे पुणे विभागाचे अध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे, सेक्रेटरी प्रभाकर व दिलीप भिडे सातारा संमेलनाचे मागचे सूत्रधार श्री. सुनील भिडे वगैरे सर्व भिडे मंडळी स्थानापन्न झाली. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. सातार्‍यांतील भगिनींनी स्वागतगीत सादर केले. त्यानंतर उपस्थित सर्व भिडे मंडळींनी ज्ञात अज्ञात दिवंगत भिडे मंडळींना श्रद्धांजली वाहिली. यावेळेला प्रथमच प्रतिष्ठानचे सर्व कार्य अंगावर घेऊन कार्यरत असणारे श्री. दामोदरपंत भिडे यांची अनुपस्थिती मनाला खिन्नता आणत होती. त्यांची आठवण म्हणून स्वागत कमानीला 'कै. दामोदर भिडे प्रवेशद्वार' असे नांव दिले होते. श्रद्धांजलीपूर्वी प्रतिष्ठानचे सेक्रेटरी प्रभाकर भिडे यांनी तसेच पुण्याच्या दिलीप भिडे यांनी दामूकाकांच्या अनेक आठवणी सांगितल्या. तसेच दामूकाकांची कन्या सौ. अनघा सातर्डेकर यांनी वडिलांच्या अनेक आठवणी सांगत बाबांनी प्रतिष्ठानला कसे वाहून घेतले होते ते सांगितले. यावेळी त्यांची सून, मुलगा व जावई हे सर्व संमेलनाला उपस्थित होते. जवळ जवळ २०० पर्यंत भिडे मंडळी संमेलनाला आली होती. संमेलनाचे स्थळ किंवा हॉल इतका प्रशस्त व सुंदर होता की तेथे होणारे सर्व कार्यक्रम यशस्वी होणार याची खात्री वाटत होती.

सौ. सुप्रिया भिडे यांनी संमेलनाचे अध्यक्ष श्री. दत्तात्रय अनंत भिडे यांचा सुंदर परिचय करून दिला. तसेच कार्यकारिणीच्या पदाधिकार्‍यांची ओळख पुण्याच्या ले. क. सुनील भिडे यांनी करून दिली. भिडे प्रतिष्ठानचे १२ वे संमेलन सातार्‍याला भरत असून प्रतिष्ठानचे सचिव प्रभाकर भिडे यांनी प्रतिष्ठानच्या कार्य व वाटचालीबद्दल विस्तृत माहिती दिली तसेच पुढील उद्दिष्टे काय आहेत ते सांगितले. भिडे कुलवृत्तांमधील सातार्‍यातील भिडे मंडळींच्या अनेक आठवणी सांगितल्या. काही आठवणी ऐतिहासिक व सातार्‍यासंबंधी होत्या त्या लोकांना विशेष आवडल्याचे दिसले. सांगलीच्या श्री. कुमार भिडे यांनी प्रतिष्ठानचे विविध पुरस्कारांची (व विशेषत: सांगलीतील व मिरजेमधील भिड्यांनी ठेवलेल्या पुरस्कारांची) माहिती दिली.

पुण्याहून चित्पावन संघाचे पदाधिकारी श्री. अजित भिडे व श्री. अनिल शिदोरे मुद्दामहून आले होते. त्यांनी चित्पावन संघामार्फत सर्वांनी एकत्र यावे चित्पावन संघाचेही पुरस्कार व शिष्यवृत्त्या आहेत त्याचा लाभ घ्यावा असे सुचविले. चित्पावन फौंडेशनचे कार्याची माहिती दिली.

नंतर दुसर्‍या दिवशीच्या कार्यक्रमाची रूपरेषा जोगेश्वरीच्या अजय भिडे यांनी दिली. नंतर विविधगुणदर्शन कार्यक्रमाची रूपरेखा सूत्रसंचालिका सौ. सुप्रिया भिडे यांनी करून दिली. सातार्‍यातील प्रसिद्ध कास तलाव व तेथील वनस्पतींची ध्वनिचित्र फीत दाखविण्यात आली. सौ. सुप्रिया भिडे व त्यांच्या सहकलाकारांनी अनेक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमात वेळ कसा गेला ते कळलेच नाही. नंतर सुंदर भोजनाचे आस्वादाने मंडळी तृप्त झाली. यावेळी भोगीची आठवण व्हावी इतके सुंदर भोजन सातारकरांनी दिले. भोजनानंतर गिरगांव मुंबई येथील श्री. सतीष भिडे यांनी सावरकर गीत गायनाचा सुंदर कार्यक्रम सादर केला व कार्यक्रम एका विशिष्ट पातळीवर नेल. अशा प्रकारे पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमांची सांगता झाली. रात्री बरेच उशिरापर्यंत भिडे मंडळी बाहेरगावहून येतच होती.

दुसरा दिवस उजाडला तो पहाटेच्या सुमधुर गीतांबरोबर. थंड सुखकारक हवा, गरम चहा, संतांचे भक्तिसंगीत वातावरणात प्रसन्नता आली होती. लगीनघाई सारखी सगळ्यांची आंघोळीला घाई सुरू होती. एकीकडे नवीन लोकांचे आगमन व स्वागत होत होते. वातावरण उत्साही व आनंदी होते. सकाळचा ब्रेकफास्ट घेऊन मंडळी १० च्या सुमारास सभेला येऊन बसू लागली. बघता बघता सभागृह भिडे मंडळींनी भरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कालच्याप्रमाणेच सौ. सुप्रिया भिडे करीत होत्या. त्या स्वत: व त्यांच्या सर्व सहकारी भिडे भगिनी नऊवारी नेसून नटून थटून आल्या होत्या. स्त्रियांमधील उत्साह वाखाणण्याजोगा होता. व्यासपीठावर मान्यवर मंडळी म्हणजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. माधवराव भिडे, पुणे विभागाचे अध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे, सातारा संमेलनाचे अध्यक्ष श्री. दत्ताजी भिडे, सचिव श्री. प्रभाकर भिडे, तसेच पुण्याचे दिलीप भिडे, कर्नल सुनील भिडे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष वसईचे श्री. मुकुंदराव भिडे व इतर कार्यकर्ते स्थानापन्न झाले.

प्रथम सातारा संमेलनानिमित्त प्रतिष्ठानचे त्रैमासिक ''आम्ही भिडे'' च्या जानेवारी अंकाचे प्रकाशन अध्यक्षांच्या हस्ते झाले. प्रकाशनानंतर सचीव प्रभाकर भिडे यांनी अंकासंबंधी, त्यातील लेखांसंबंधीची माहिती सांगितली. या अंकात माजी अध्यक्ष श्री. प्रदीप भिडे यांचा पुतळ्यांचे संमेलन हा लेख शिवाय दिवाळीच्या निमित्ताने हा प्रभाकर भिडे यांचा लेख, दिलीप भिडे यांचा प्रतिष्ठानसंबंधी लेख श्री. दामोदर भिडे यांच्या आठवणी जागविणारा लेख इ. माहिती असल्याचे सांगून अंक आकर्षक व माहितीपूर्ण झाला असल्याचे सांगितले. पुण्याच्या दिलीप भिडे यांनी अंक छापताना येणार्‍या अडचणी तसेच अंकाची आर्थिक बाजू समजावून सांगितली. अंकाचे काम करणारे विनायक भिडे यांना विशेष धन्यवाद दिले. त्यानंतर 'विद्यार्थी गुणगौरव' कार्यक्रमात प्रत्येक शिष्यवृत्तिप्राप्त विद्यार्थ्यांची ओळख व माहिती सूत्रसंचालिका सौ. सुप्रिया व पुण्याच्या सौ. प्रिया भिडे करून देत होत्या. दरवर्षी 'विद्यार्थी गुणगौरव' या विभागाची जबाबदारी सांभाळणार्‍या 'डॉ. धनश्री भिडे' यांची आठवण झाली मात्र. गुणगौरव कार्यक्रमानंतर ज्येष्ठ भिडे मंडळींचा 'जीवन गौरव सत्कार' करण्यात आला. प्रत्येक सत्कारमूर्तींची माहिती श्री. सुनील भिडे अतिशय खुसखुशीतपणे सांगत होते. त्रैमासिकांत सर्वांची माहिती व फोटो दिले असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती येथे करीत नाही.

पुढील मजकूर पान ६ वर . . . .

# आमचे ध्येय..

## परिपूर्ण औद्योगिक सहाय्य !




# भिडे यंत्र लोह वस्तु केंद्र

**मुख्य शाखा**

730, गणपती पेठ, सांगली. 416 416 फोन : 0233 - 2373220, 2326478 Email : bylvk@dataone.in

**कोल्हापूर शाखा**

448/बी, पूना-बेंगलोर हायवे, मु. पो. नागाव, 416 122 फोन : 0231 - 2469448/49

# बालपणीची दिवाळी

श्री. प्रदीप ज. भिडे, मुंबई
मो.९८११९१४०९४२

'रम्य ते बालपण' असं माणूस आयुष्यभर म्हणत राहतो. पण केव्हा ? तर बालपण संपल्यावरच. कारण लहान असताना, 'आई, मी मोठा कधी होणार ? ' असा धोषा आपण नेहमी लावत आलेले असतो. मला माझ्या बालपणाची इतकी आठवण होण्याचं कारण म्हणजे या महिन्यात येणारी दिवाळी.

माझं लहानपण पश्चिम महाराष्ट्रातल्या पाच छोट्या-मोठ्या गावात गेलं. खेड मंचर भागातल्या धामणी नावाच्या तीन हजार वस्तीच्या गावातली दिवाळी मी कधीच विसरू शकत नाही. विशेषत: ८ वी ते ११ वी या चार वर्षांच्या कालखंडातली. आम्हा भावंडांचं दिवाळीतलं मुख्य आकर्षण असायचं फराळ आणि फटाके. चिवडा, चकल्या आणि चिरोटे हे 'च' च्या बाराखडीतले पदार्थ आईने करावेत यासाठी दिवाळीच्या आधी, महिन्याभरापासून आम्हा भावंडांची आईमागे भुणभुण सुरू असायची. मी साऱ्या भावंडात मोठा असल्याने फराळासाठीच्या वस्तूंची यादी माझ्या हातात देऊन आई-अण्णा मला देखण्यांच्या किराणा मालाच्या दुकानात पिटाळायचे. माझा पाठचा भाऊ दिलीप, धाकटा स्वरूप आणि शेंडेफळ सीमा अशी सगळी वरात माझ्यापाठोपाठ यायची. आई-अण्णा शिक्षक असल्याने, शाळेला दिवाळीची सुट्टी लागल्यावर दिवाळीच्या आठवडाभर आधी, आई रोज एकेक पदार्थ बनवायला लागायची. आईचा डोळा चुकवून फराळाच्या डब्यातल्या खमंग वस्तूंवर ताव मारल्याचं मला अजूनही आठवतंय.

फराळाच्या पाठोपाठ आम्हाला फटाक्याचे वेध लागायचे. आमच्या मित्रांच्या आईबाबांनी त्यांच्यासाठी कोणकोणते फटाके आणले आहेत याची आम्ही पाहणी करायचो. मग एक यादी बनायची. बहीण आवाजी फटाक्यांना घाबरत असल्याने तिच्यासाठी शोभेची दारू म्हणजे फुलबाज्या-भुईनळे-सुदर्शनचक्र इत्यादी. कारण ती तशी घाबरट असल्यामुळे भुईनळे आणि सुदर्शनचक्र आम्हालाच लावायला मिळणार याची खात्री असायची, म्हणजे आणायची तिच्या नावावर, आणि ती लावून मोकळे व्हायचो आम्ही.

अण्णांनी फटाके आणले की ते ठेवायला, ते एक पत्र्याची छोटेखानी पेटी काढायचे. पेटीच्या चार कोपऱ्यात आम्हा चारही भावंडांचे फटाके वाटून ठेवले जायचे. मी दादा असलो तरी इकडचे तिकडचे पळवायची हिम्मत माझ्यात नव्हती. कारण इतर तिघेही जण डोळ्यात तेल घालून त्या पेटीतल्या चारही कोपऱ्यावर पहारा ठेवायचे. हा हा म्हणता ते फटाके संपून जायचे आणि वडिलांकडं एक पुरवणी मागणी सादर व्हायची.

गावाच्या दोन वेशींच्या मध्ये त्यावेळी लांबचलांब वाटणारा धामणीतला तो अरुंद रस्ता. दुतर्फा एकाला एक अशी लागून असणारी छोटी-छोटी एक मजली तसंच बैठी घरं. घरोघरीच्या बायका आपापल्या घरासमोरचं अंगण झाडून - ते स्वच्छ करून पाण्याचा सडा घालायच्या. प्रसंगी काहीजणी सारवायच्याही. मग त्यावर सुरेख रांगोळ्या घालायच्या. तेल घातलेल्या मातीच्या पणत्या सगळा रस्ता उजळून टाकायच्या. काही मोजक्या घरांसमोर आकाशकंदील पेटलेले असायचे. आम्ही धामणीमध्ये रहायला गेलो तेव्हा पहिली काही वर्षे तिथं वीज नव्हती. त्यामुळे रात्री कंदील किंवा मिणमिणत्या दिव्यांची सवय असणाऱ्या त्या गावात जेव्हा दिवाळी यायची तेंव्हा मात्र त्या चार-पाच रात्री पणत्या-आकाशकंदील-शोभेची दारू याने सगळं गाव संध्याकाळी प्रकाशानं न्हाऊन निघायचं-उजळून जायचं. त्या प्रकाशमयी संध्याकाळी अजूनही माझ्या स्मरणात आहेत. नरकचतुर्दशीच्या पहाटेला शेजारच्या विठ्ठल मंदिरात गायली जाणारी भजनं-घंटानाद यानं आम्ही सगळी भावंड जागे व्हायचो. त्या भजनाच्या स्वरांची एक विलक्षण मोहिनी असायची. 'आम्ही पहाटे उठायला कुरकुर केली तरी आम्हाला चक्क धपाटे घालून उठव हो' असे आम्ही आईला बजावलेलं असायचं कारण त्या भजनाच्या पार्श्वसंगीताच्या नादावर वडिलांनी आम्हाला सुगंधी तेल आणि उटणं लावून केलेलं मालिश आणि आईनं परसदारातल्या विहिरीजवळ बाजूच्या चुलीवर कडकडीत तापवलेलं पाणी बादलीत, थोड्या साध्या पाण्यात मिसळून, ते गरमागरम पाणी आमच्या अंगावर टाकत घातलेली आंघोळ आम्ही कधीच विसरू शकत नाही. शेवटी बादलीत उरलेलं थोडं-फार पाणी बादलीच उलटी करून आई आमच्या अंगावर टाकायची तेंव्हा 'शंभो महादेव' असा पुकारा करत आम्ही टॉवेल घ्यायला धावायचो. आंघोळ करत असताना अनेकदा बहीण फुलबाज्या पेटवून त्या मुद्दामच आमच्या अंगाजवळ धरायची. त्यानं एरवी धीट असणारे आम्ही घाबरून जाऊन, 'अगं वेडे, त्या फुलबाज्यांच्या ठिणग्या अंगावर पडतील ना ! असं ओरडायचो. आणि ती मात्र 'कशी अद्दल घडवली !' अशा आविर्भावात हसायची.

पाडव्याच्या दिवशी घरात श्रीखंडाचा बेत असायचा. आणि आम्ही सारेजण श्रीखंड कसं बनतंय हे बघायला टपून बसलेलो असायचो. दोन तीन दिवसांचं दूध एकत्र करून आईनं दोन भल्या मोठ्या स्टीलच्या पातेल्यात दही टाकून त्या कपड्याची चारी टोकं एकत्र करून आणि बांधून खुंटीवर टांगायचे. आम्ही सगळी भावंड त्या टांगलेल्या फडक्यातून खाली जमिनीवर ठेवलेल्या भांड्यात टपटप करत ठिबकणाऱ्या पाण्याकडं एकटक बघत राहायचो आणि ते पाणी ठिबकणं केव्हा थांबणार याची वाट पाहायचो. आई मात्र अशा वेळी आमच्या पाठीत धपाटे घालून आम्हाला झोपायला पिटाळायची. दुसऱ्या दिवशी वडील त्या फडक्यातला तयार झालेला चक्का एक मोठ्या पातेल्यात टाकून त्यामध्ये साखर, वेलदोड्याची पूड, चवीपुरतं जायफळ आणि केशर टाकून घोटत-घोटत श्रीखंड बनवायचे. त्यावेळी पण आम्ही वडिलांच्या सभोवती बसून श्रीखंड कसं बनतंय बघायचो. याचं कारण वडील मधेच डावातून आमच्या हातावर, बनत असणारं श्रीखंड किंचितसं टाकायचे आणि विचारायचे, 'साखर पुरेशी आहे असं वाटतंय ना ? की अजून टाकायला हवी ?' थोडक्यात त्या अर्थाने क्वालिटी कंट्रोल' आमच्या ताब्यात होता. एकूणातच श्रीखंड बनवणे हा एक साग्रसंगीत कार्यक्रम होता.

जेवणामधे श्रीखंडपुरीच्या जोडीला बटाट्याची भाजी, केळाची दह्यातली कोशिंबीर, कुरड्या, पापड्या, मसाले भात . . . . दिवाळीतल्या पाडव्याच्या जेवणाचा तो बेत इतक्या वर्षांनंतरही मनात अजूनही ताजा आहे. त्या पदार्थांचा सुवासासहित आणि चवीसह देखील ! पुढे नववी-दहावीत असताना आम्हाला दिवाळी अंकांची चटक लागली. जी. ए. कुलकर्णी, व. पु. काळे, नारायण धारप, इंद्रायणी सावरकर, रत्नाकर मतकरी, जयवंत दळवी इत्यादी नामवंत लेखक मंडळी आम्हाला या दिवाळी अंकातून भेटत गेली. आम्हाला या लेखकांच्या लिखाणाची चटक लागली ती या दिवाळी अंकामुळेच. जास्तीतजास्त दिवाळी अंक कुणी वाचले यावरून आम्हा मित्रांची स्पर्धा लागायची. मी नववीमध्ये असताना ६० ते ६५ दिवाळी अंक वाचून काढल्याचं मला अजूनही स्मरतंय. दिवाळीच्या चार दिवसात एकदातरी धामणी गावचे ग्रामदैवत असलेल्या खंडोबाच्या मंदिरात दर्शनाला जायचा आमचा परिपाठ असायचा.

मॅट्रिक होऊन पुण्याला कॉलेजला आल्यावर आई-वडील पण पुण्याजवळ हडपसरच्या शाळेत बदली होऊन आले. आणि मग दिवाळीची ती बालपणीची मजा राहिली नाही. कॉलेजचं शिक्षण होऊन मुंबईला नोकरीसाठी आलो आणि यथावकाश संसार सुरू झाला. खार या उपनगरात राहात असताना पत्नी सुजातासह अक्षय प्रियांकाला घेऊन केलेली, दिवाळीतली कपडे आणि फटाक्यांची केलेली खरेदी अजूनही आठवणीत आहे. प्रियांका फटाक्यांना खूप घाबरायची. अगदी फुलबाज्यांना देखील. त्यामुळे सगळे फटाके अक्षयच उडवायचा. नरकचतुर्दशीला वडिलांनी आम्हाला प्रेमानं केलेलं तेलमालिश आठवतं, मी देखील पोरांसाठी मालिशवाला व्हायचो. बघितलंत ना, दिवाळीचा हा थाटमाट एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत अखंड चालू असतो. अगदी

पुढील मजकूर पान नं. ६ वर . . . .

. . . . बालपणीची दिवाळी पान नं. ५ वरून पुढे चालू

पिढ्यान्‌पिढ्या. 'रिश्ता वही सोच नयी !' असा !

मुलं मोठी झाली आणि आयुष्यातली दिवाळीची धमाल त्या अर्थानं संपली. मुंबईतला फटाक्यांचा आवाज दरवर्षी टिपेला जात राहिला - अगदी कानठळ्या बसाव्यात असा. लोकांची वस्तू खरेदीची हौस - चंगळवाद - तो देखील अफाट म्हणावा इतका वाढला. त्याचा अक्षरश: कडेलोट झाला. मध्यमवर्गीयांच्या हातात पैसा खेळू लागल्यामुळं आकाशकंदील, पणत्या, फराळाच्या वस्तु, कपडे, दागदागिने, शोभेच्या वस्तु, भेटवस्तु यानं रस्ते ओसंडून वाहू लागले. एकीकडे देशात दिसणाऱ्या सुबत्तेमुळं कमालीचा आनंद वाटत असला तरी लहानपणी, त्या छोटयाशा गावाकडच्या दिवाळीचा आत्मा, या शहरातल्या दिवाळीतून हरपलाय की काय ?' असं वाटत राहतं.

आजच्या घडीला दिवाळीसारख्या सणांच्या निमित्तानं होत असणारी पैशाची उधळपट्टी आणि बालपणीच्या दिवाळीमध्ये अनुभवलेले कुटुंबातले भावंडांमधले भावबंध - त्या गमती जमती, यातलं कुठलं पारडं जड आहे ? या प्रश्नाचं उत्तर मिळत नाही. अशा वेळी 'कालाय तस्मै नम:' असं म्हणत येणाऱ्या परिवर्तनाला सामोरं जाणं एवढंच आपल्या हाती उरत असावं का ? प्रश्न खूप आहेत उत्तरं ज्यानं त्यानं शोधावीत झालं !

**भिडे संमेलन - एक आनंदोत्सव . . . .** **पान नं. ३ वरून पुढे चालू**

पुढील कार्यक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. माधवराव भिडे यांनी भिडे तरुण-तरुणींनी नोकरीची अपेक्षा न धरता व्यवसायात उतरावे व आपला उत्कर्ष करावा असे सांगून त्यांच्या सॅटर्ड क्लब तर्फे ते सर्व मदत करण्यास तयार असल्याचे आपल्या भाषणातून सांगितले. श्री. शशिकुमार भिडे यांनी भिडे प्रतिष्ठान पुढे काय करू शकते तसेच आपण एकमेकांना मदत करून भिडे मंडळींनी समाजात अग्रेसर रहावे असे आपल्या बोलण्यातून सुचविले. श्री. मुकुंदराव भिडे यांनी प्रतिष्ठानचे पुढील उद्दिष्ट यांची माहिती सांगून भिडे मंडळींनी वेगवेगळ्या विभागात संमेलने भरवावीत व आपल्या विभागातील भिड्यांची माहिती करून घ्यावी. त्यातून एकमेकांना कशी मदत करता येईल ते सुचविले. शेवटी संमेलनाचे अध्यक्ष श्री. दत्तात्रय भिडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सातारकर भिडे मंडळींतर्फे प्रतिष्ठानला रु. ५१,०००/- देणगी जाहीर केली. तसेच ब्राह्मण समाज (विशेषत: भिडे मंडळींनी) पुढे काय करावे याचे मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमानंतर सातारकर जागृती मंडळाचा सांस्कृतिक कार्यक्रम सौ. सुमनताई भिडे व त्यांच्या सर्व सहकारी महिलांनी सादर केला. त्यामध्ये विविध सणांचे महत्त्व नृत्य नाट्य व गायन अशा पद्धतीने सर्वासमोर मांडले. त्यासाठी सर्व भगिनींनी नऊवारी साडी नथ असा पारंपारिक वेष परिधान केला होता. कार्यक्रम दृष्ट लागण्यासारखा झाला. सर्व उपस्थितांनी कार्यक्रमाला भरभरून दाद दिली.



प्रतिष्ठानतर्फे साताऱ्च्या सर्व कार्यकर्त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

दुपारचे भोजन साग्रसंगीत होते. त्यात गुलाबजाम व इतर पदार्थांची रेलचेल होती. कार्यक्रम यशस्वी झाल्याचे समाधान भिडे मंडळींच्या चेहऱ्यावर दिसत होते. साताऱ्याच्या मंडळींचे विशेष आभार मानले पाहिजेत कारण त्यांनी कार्यक्रमाची पूर्वतयारी, सादरीकरण अतिशय उत्साहात व जिव्हाळ्याने केले होते. सातारा संमेलनाची कल्पना पुण्याचे कर्नल सुनील भिडे, दिलीप भिडे व इतर कार्यकर्त्यांनी ठरवून अत्यंत यशस्वीपणे पार पाडली.

भोजनोत्तर कार्यक्रमात पुढील वर्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलना संबंधी चर्चा, तसेच कार्यक्रमात स्त्रीयांचा सहभाग असे विविध विषय चर्चिले गेले. त्यात विभागवार संमेलनाची आवश्यकता सर्वांना पटली. संध्याकाळी ५ वाजता चर्चासत्र संपले व दोन दिवसाच्या कार्यक्रमाचे सूप वाजले.







धन्यवाद !

**सातारा येथे जानेवारी २०१३ ला झालेल्या भिडे कुलसंमेलनामध्ये सर्व सातारा भिडे बंधू-भगिनीं आणि माहेरवाशिणींतर्फे रु. ५१,०००/- ची देणगी मिळाली.**

# आम्ही (लोचट) भिडे

दिलीप वा. भिडे (पुणे)
मो. ९६५७५४१२३६

एखादी संस्था निस्वार्थीपणे पुढे न्यायची म्हणजे वेळ, नियोजन, आर्थिक अडचणी, सचोटी या सर्व परीक्षांना तोंड द्यावे लागते. भिडे प्रतिष्ठानचा हा वृक्ष मोठा होऊन त्याचा एकमेकांना उपयोग व्हावा व एक आदर्श संस्था उभी रहावी याकरिता प्रत्येक भिडे व्यक्ती प्रयत्न करीत आहे.

भिडे प्रतिष्ठानच्या अनेक कार्यक्रमांपैकी वार्षिक संमेलन हा मोठा कार्यक्रम दरवर्षी साजरा होत आहे. आतापर्यंत प्रत्येक संमेलनानंतर संमेलन कुठे व कसे साजरे करायचे याबद्दल प्रतिष्ठानची कार्यकारिणी चाचपणी करते. तसेच संमेलनाचे ठिकाण ठरविण्या अगोदर त्या गावातील स्थानिक भिडे कुटुंबीयांचा सहभाग महत्वाचा असतो. सातारा संमेलन घेण्याकरिता समन्वायक (Co-ordinator) म्हणून ले. क. सुनील भिडे यांनी केलेल्या प्रयत्नांचे एक फलित म्हणजेच गतवर्षाचे सातारा संमेलन आहे. भिडे कुल संमेलन म्हणजे भिडे कुटुंबातीलच एक कार्य आहे असे समजून आपण सर्वच जण मनापासून काम करत असतो. तसेच संमेलन यशस्वी करण्या करिता स्थानिक कार्यकर्त्यांची तयारी करणे, उपलब्ध असलेल्या आणि संख्याबळ जास्तीतजास्त यावे यासाठी सर्वांच्या सोयीची तारीख ठरविणे, त्यानंतर ठिकाण ठरविताना भोजन व निवासव्यवस्था या सोयींचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. दिवसेंदिवस महागाई वाढत असल्यामुळे खर्चाचा ताळमेळ बसवून कमीतकमी खर्चात सर्वांना येता यावे यासाठी परवडेल अशी वर्गणी ठरविणे, तसेच संमेलन निमंत्रणे पोस्टाने, कुरियरने, ई मेल किंवा वेबसाइटद्वारा देऊन त्याला प्रसिद्धी देणे इ. तयारी ६ महिने अगोदर सुरू होते.

एवढी तयारी करूनसुद्धा संमेलनामध्ये काही त्रुटी राहतातच. कदाचित कार्यकर्त्यांचे संख्याबळ कमी असल्यामुळे सुद्धा असेलही. म्हणून संमेलन व्यवस्थापनात अधिकाधिक लोकांचा सहभाग वृद्धिंगत व्हावा याकरिता सातारा संमेलनाची सांगता होताना पुढील वर्षीचे संमेलन कुठे व कसे साजरे करावे ? किंवा संमेलनाच्या स्वरूपात बदल करावा काय? याकरिता सातारा संम्मेलनात १तासाची खुली चर्चा आयोजित केली होती. प्रत्येकाने त्याबाबत आपली मते प्रदर्शित केली व पुढील वर्षी बहुतांशी डोंबिवली किंवा ठाणे परिसरात संमेलन होण्याच्या आशा दिसत आहेत. हे त्या चर्चेचे एक फलितच म्हणावे लागेल. परंतु या चर्चेचा विषय सोडून प्रतिष्ठानच्या एका ज्येष्ठ माजी पदाधिकाऱ्यांनी केवळ एखाद्या वर्षी कार्यकारिणीत समाविष्ट न केल्याच्या आकसापोटी कार्यकर्त्यांना लोचट किंवा तत्सम शब्द वापरून कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करणे ही बाब मनाला खंतावून जाते. आम्ही (लोचट) भिडे, प्रतिष्ठानचे कार्य वृद्धिंगत होण्याकरिता, निःस्वार्थपणे वेळप्रसंगी पदरमोड करूनसुद्धा लोचटपणा करतो हे वैयक्तिक स्वार्थापोटी नव्हे. आम्हाला असा लोचटपणा करण्याकरिता जरासुद्धा शरम वाटत नाही. वैयक्तिक स्वार्थासाठी कधीही प्रतिष्ठानचा वापर केलेला नाही. परंतु चर्चेचा विषय सोडून किंवा व्यासपीठावरून बोलताना कार्यकर्त्यांनी फक्त न केलेल्या कामाचा जाब विचारणे किंवा न केलेल्या कामाबद्दल उपरोधिकपणे बोलून किंवा प्रतिष्ठानला वृद्धिंगत करणाऱ्या कार्यकर्त्यांना 'लोचट' म्हणून नाउमेद करणे हीच आम्ही केलेल्या कामाची पावती आहे काय ? म्हणून अशा नाउमेद करणाऱ्या व्यक्तींना मी विनंती करतो की आम्हाला तुमचे कौतुक नको, शाबासकी नको, मानसन्मान नको, कोणतेही पद नको परंतु प्रतिष्ठानचे कार्य अव्याहत सुरू रहावे आणि भिड्यांनी भिड्यांकरिता सुरू केलेले प्रतिष्ठानचे कार्य अखंडपणे सुरू रहावे असे वाटत असेल तर किमानपक्षी त्यांना नाउमेद तरी करू नका. कारण संस्था सुरू राहण्यासाठी सांघिक ताकद महत्वाची असते याचे भान ठेवायला हवे !

तसेच या चर्चेमध्ये प्रतिष्ठानच्या कामामध्ये महिलांना समाविष्ट करून घेण्याबाबत चर्चा झाली. याबाबत आम्ही भिडे अंक ७ एप्रिल २०११ यामध्ये मी स्वत: महिलांची व तरुणांची उपस्थिती व सहभाग वाढविण्याकरिता आवाहन केलेले होते. त्याप्रमाणे महिलांनी उत्तमपणे प्रतिसाद देऊन चैत्रागौरी हळदी-कुंकू व महाभोंडला यासारखे कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित केले. त्यांचे नियोजन व आयोजन सरस आहे हे निर्विवाद आहे. हे माहीत असल्यामुळे सातारा संमेलनाच्या खुल्या चर्चेत एखादे संमेलन महिलांनी आयोजित करावे म्हणजे महिलांचे नियोजन असलेले संमेलन असावे असा त्याचा अर्थ होता परंतु महिलांचे नियोजन असलेले संमेलन म्हणजे भिडे बंधू आपल्यावरील जबाबदारी त्यांचेवर टाकणार असा नव्हे. कारण पुण्यातून महिलांचे असे कार्यक्रम करतांना भिडे कुलबंधूंनी महिलांच्या प्रत्येक कार्यक्रमाचे वेळेस केलेली मदत हे कोणी नाकारणार नाही असे वाटते. भिडे प्रतिष्ठानमध्ये महिला व पुरुष किंवा सभासद आहे का नाही असा भेदाभेद कधीही केला जात नाही. त्या दृष्टीने महिलांचे नियोजन असलेले संमेलन आमच्या भगिनी व माहेरवाशिणी उत्तम सादर करतील याबद्दल आम्हास विश्वास वाटतो असा त्याचा अर्थ आहे. तसेच प्रत्येक संमेलनामध्ये सूत्रसंचालन, पुरस्कार, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठांचा सत्कार या इतर बाबी महिलांकडेच सोपविल्या जातात. मागीलवर्षी कार्यकारिणीत २ ते ३ महिलांचा सहभाग होण्याकरिता प्रस्तावास सहमती झाली परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे त्याची अंमलबजावणी झाली नाही. तरीसुद्धा संमेलनामध्ये महिलांना यापेक्षा अधिक सन्मान मिळेल याकरिता सकारात्मक प्रयत्न मी करेन असा विश्वास देतो. कारण भिडे प्रतिष्ठानमध्ये 'मी' पेक्षा 'आम्ही' ला महत्व अधिक आहे.

सातारा येथे आयोजित केलेल्या चर्चेमुळे कोणी दुखावले गेले असल्यास त्यांनी मला मोठ्या मनाने क्षमा करावी तसेच प्रतिष्ठानच्या कामामध्ये असलेल्या माझ्या सहभागाचे शल्य कोणाला वाटत असेल तर मी कार्यकारिणीबाहेर बसूनसुद्धा अखंड काम करेन. परंतु केवळ आकसापोटी किंवा मनात किल्मिष ठेऊन व्यासपीठावरून अपशब्द वापरणे हे ज्येष्ठ भिडे मंडळींना अशोभनीय आहे. चूक होणे हा स्वभावधर्म आहे. आमचेकडूनही काही चुका होत असतील परंतु ज्येष्ठांनी किंवा अनुभवी मंडळींनी योग्य पद्धतीने चुका समजावून सांगितल्या तर योग्य होईल असे वाटते. आम्ही सुद्धा आमचा नोकरी, उद्योग-व्यवसाय, घर व इतर व्याप सांभाळून स्वयंस्फूर्तीने हे काम करतो आहोत. परंतु जाहीररीत्या फक्त वेडेवाकडे बोलून कार्यकर्त्यांची स्फूर्तीच नाहीशी झाली तर कार्यकर्ताच दुरावेल याचे भान असावे.

**सातारा येथे झालेल्या भिडे कुलसंमेलनात आपल्या व्यवसायाचा बॅनर देऊन सहकार्य करणारे दानशूर**

१) श्री. मिलिंद निलकंठ भिडे, सूर्यशिबीर, पुणे
२) श्री. विजय गोविंद साने, बेळगांव
३) मेसर्स जगन्नाथ किसनदास देवी ॲन्ड सन्स, सातारा
४) मॉडेल डेव्हलपर्स, सातारा
५) मे. प्रकृती आयुर्वेदिक रिसॉर्ट, सातारा
६) मे. पी. एन्. गाडगीळ ॲन्ड सन्स्, पुणे

# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : **2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.**
Output Capacity : **200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.**
Motor driven & Engine Driven Model also available

## INDUSTRIAL PRODUCTS

### PISTON VALVES
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

### HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)



**Pressure - From 30 kg/cm² to 300 kg/cm²**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

### CASTINGS



**Heavy C.I. Castings**
**Maximum single piece - 2 Tonn**

### S.G.IRON FOR AUTO COMPONENTS



**Castings :**
**Steel, Stainless Steel & S.G. Iron**
**Range - From 1 kg. To 100 kg.**

### LADDLE



**Foundry Crane Laddles**
**Capacity : Upto 20 Ton**

# स्मृतिगंध

सौ. वीणा केळकर
९९२१९४३८१३

माघातली परवाची संकष्टी चतुर्थी, आईचं पहिलं श्राद्ध ! गेलं वर्षभर विविध गोष्टींमधून, पदार्थांमधून तिची होणारी आठवण. 'ती आता नाही' हे सतत जाणवून देत होती. खरं तर 'आई' नसणं हे आयुष्यभराचं दुःखच मात्र तिला रडतरडत आठवण्यापेक्षा तिच्या आवडीच्या गाण्यांमधून आठवूया असं आम्ही केळकरांनी ठरवलं. सकाळी धार्मिक विधी करायचे आणि दुपारी आईची आवडती गाणी म्हणायला मैत्रिणींना बोलवायचे. सगळ्या मुला नातवंडांनी - नातलगांनी आई विषयी आठवणी सांगायच्या. असं ठरलं. सुधीर फडके आणि माणिक वर्मांची गाणी. ती दोघं आईसाठी दैवतं - माणिक बाईंच्या घरासमोरच त्यांच्या पुण्यातल्या वास्तव्याच्या काळातच आई लहानाची मोठी झाली. आईच्या लग्नाला माणिकबाई आल्या होत्या आणि पंगतीत त्या गायल्याही होत्या. ही आठवण परत एकदा मामानी सांगितली. पुण्यात नूमवि शाळेत सुधीर फडके यांचं गीत रामायण दरवर्षी रात्र जागवून आईनं ते ऐकल्याचं तिच्याकडूनच अनेकदा ऐकलं होतं. गीतरामायणाचं पुस्तक हाताळून, वाचून खिळखिळं झालेलंही पाहिलं होतं आणि त्यातली गाणी, तोंडपाठ आईकडून ऐकलेली होती. गाण्यांची तिची आवड ही लहानपणापासूनचीच. गाणीच काय नाटक, नाट्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा सान्यातून गाजलेली आई, कन्या शाळेतली हरहुन्नरी कलाकार. लग्नाची जोडीही हौशी रंगभूमीवर करत असलेल्या नाटकातच जमली आणि संसारच्या धबडग्यात गाणं मागे पडले. मात्र साठीनंतर आणि पपांच्या जाण्यानंतर ती पुन्हा गाणं शिकू लागली. सुगम संगीताचा क्लास आपल्याच मैत्रिणीकडे लावला आणि तरुण विद्यार्थ्याला लाजवेल इतका नित्यनेम साठीतही बाळगला. म्हणून तर गाणं शिकवणारी माझी मैत्रीण आणि वहिनींची मैत्रीण यांनी हा आईच्या स्मृति प्रीत्यर्थ गाण्यांचा कार्यक्रम अतिशय श्रद्धेनं केला. सगळ्याच नातलगांच्या, आई विषयीच्या आठवणींनं तो कार्यक्रम जास्तच हृद्य झाला. आईचं सुगरणपण, तिो कष्ट, जिद्द, उत्साही व्यक्तिमत्त्व, सगळ्याच गुणांचा प्रत्येकाला आलेला अनुभव शब्दांत व्यक्त होत गेला आणि डोळ्यातूनही झरला. आई अनेक बाबतीत आदर्श आम्हाला आहेच पण नातलगांच्या मनांतही तिचे स्थान आदराचे, प्रेमाचे आहे हे पाहून ऐकून मन भरून आले. मात्र आईच्या स्मृत्यर्थ केलेला हा हृदयस्पर्शी आठवणींचा आणि गाण्यांचा कार्यक्रम आमच्यासाठी संस्मरणीय राहील हे नक्कीच ! आईच्या स्मृतीस त्रिवार वंदन !

९ मे २०१० च्या 'मदर्स डे' साठी 'सकाळ'च्याच आवाहना नुसार केलेली आईवरची कविता तिला तेव्हा लगेच ऐकवली होतीच पण परवा परत म्हणताना जास्त योग्य वाटली.

शब्दांत सांगता येत नाही, सांगूनही संपत नाही
जन्मापासून शेवटपर्यंत, ऋण तिचे फिटत नाही
हात तिचा पाठीवरचा भक्कमपणे जाणवत राही
नातं हे तर जन्मांतरीचं एकच नाव त्याचं - आई
स्वत:साठी जगलीच केव्हा ?
कुटुंबाला सावरत राहिली
लग्नानंतरही भावंडांचा, विचार सांभाळ करत राहिली
आमचीच काय - त्यांचीही आई होऊन जगत राहिली
चौदा वर्ष आजारी आईची शुश्रुषा करत राहिली
'देवापाशी रुजू सारं' म्हणत कष्टांचा विचार केलाच नाही
नातं हे तर जन्मांतरीचं एकच नाव त्याचं - आई
माझे लग्न पार पडावे म्हणून पॅरेलिसिसवर केली मात
जिद्द तिची दांडगीच होती आणि पपांचीही होती साथ
मुला-नातवंडांची ओढ तिला गाण्याची भक्तीची आवड खरी
हाताची चव आहे न्यारी कामाची हौस तर सगळ्यात भारी
स्वच्छता करताना दमत नाही, थकले कधी म्हणत नाही
दीपस्तंभच आमच्यासाठी आधार तिचा नेहमीच राही
नातं हे तर जन्मांतरीचं एकच नाव त्याचं - आई

# निबंध स्पर्धा



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान यांचे संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण जन्म शताब्दी महोत्सवाचे अंतर्गत निबंध स्पर्धा (८ वी, ९ वी चे विद्यार्थ्यांसाठी) व वक्तृत्व स्पर्धांचे निकाल व पारितोषिक वितरण सोहळा जानेवारी १३ मध्ये यशवंतराव चव्हाण सभागृह, पुणे येथे संपन्न झाला. समारंभाचे अध्यक्षस्थानी डॉ. व. कृ. नूलकर होते. तर विशेष उपस्थितांमध्ये भिडे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शं. त्रि. भिडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. परळीकर यांनी केले.

पेशवाई
दर्जेदार मसाले व खाद्यपदार्थ यांचे उत्पादक
*थालीपीठ भाजणी, उपवास भाजणी,
करीविरहित उपवास भाजणी, अनारसे पीठ, मेतकूट, डांगर
*कांदा पूड, लसूण पूड, हिरवी मिरची पूड, पुदीना पूड, आले पूड
रताळे पूड, केळी पूड, कढीपत्ता पूड, चिंचपूड व कसूरी मेथी
*गोडा मसाला, कांदालसूण मिरची मसाला, दाबेली मसाला,
पावभाजी मसाला, संडे मसाला, गरम मसाला,
मसाले भात मसाला, पुलाव मसाला, बिर्याणी मसाला व
बरेच काही

**उत्पादक : जयश्री संजय भिडे.**

प्रोप्रा. - ***जय गृह उद्योग***
१११११/१, उत्तर शिवाजी नगर, कै. विष्णू विनायक भिडे मार्ग,
(श्री गणपती गॅस गोडाऊन जवळ), **सांगली - ४१६ ४१६**
फोन : ०२३३-२३२१०१८/९९२१२४७३६२/९२०९२३७९५७
e-mail-peshwaimasale@gmail.com
Visit : www.peshwai.weebly.com Visit : www.sangli360.com

# BHIDE ASSOCIATES

**Synthesis of Finance Technology and Management**



Shri Madhavrao Bhide

Technical & Industrial Consultants, Valuers & Experts for rehabilitation / Revival of Sick Industries for banks & F.I.s experts in T.E.V. studies

## Highly motivated & successful Chief Associates of Bhide Associates in India




**A C Bhide**
Pune



**P J Bhide**
Kolkata



**M M Gadre**
Chennai



**Suhas Jogdand**
Vodadara



**Dr. R Z Chandak**
Amravati



**Arun Shendurnikar**
Hyderabad



**Sushil Sanghi**
Nagpur



**Prashant Raut**
Mahim H.O.



**Nitin Date**
Nashik



**Rajeshree Hajare**
Raigad Region

Corporate valuers of all types of assets including flats, land, building, machinery, experts in techno economics viability studies and lenders engineers for all types of projects in India and abroad.
Consultants to 24 Nationalised, 5 Private Banks, 10 Co-op. Banks & 5 FIs

**BHIDE ASSOCIATES** Well Established For 21 Years
**Synthesis of Finance, Technology and Management**

**Head Office - Mahim, Branch Offices - Flora Fountain, Bandra and Virar**

**Total 16 Regional Offices in India** - Amravati, Ahmedabad, Aurangabad, Belgaum, Bangalore, Chennai, Delhi, Goa, Hyderabad, Indore, Kolkata, Mumbai, Nagpur, Nashik, Pune, Pen, Sangli-Kolhapur, Vadodara

## यादिमानवाचं सेलिब्रेशन

सौ. पूर्वा प्रमोद देवधर, ठाकुरद्वार, मुंबई
मोबा. ९८६९९३९०७२

अहाहा, १जानेवारी आलं. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सारे ३१ डिसेंबरच्या रात्री पासूनच निरोप, दूरध्वनी, भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करु लागतील. मोबाईल कंपन्या विशेष दिवसांच्या अधिक कमाईने मालामाल होतील. सारे Mob. PC ला चिकटतील. तोंडाला फेस येईपर्यंत फेस बुक सोडणार नाहीत. Twiter, Blog. आणि आणखी काही नाही. दिवसागणिक नवीन प्रकार. माणसं कॉम्प्यूटरसाठी की कॉम्प्यूटर माणसांसाठी ? घड्याळाचा शोध मानवाने लावला की मानवाचा घड्याळाने ? अशा शंका येण्याइतपत माणसे यंत्रांच्या अधीन झाली आहेत. पूर्वीचा आदिमानव हातापायांवर वाकून चालत असे त्याच्या पाठीचा कणा ॲक्टिव्ह नव्हता. हल्लीचा यादिमानव एवढा ताठ चालतो की, उरावर बऱ्याच कामांचा बोजा घेऊन पाठीचा कणा ताठ होऊन मोडेल की काय ? अशी शंका येते. ओझ्याने ताणतणावाने, ऊर, मेंदू फाटेल की काय अशी भीती वाटते. पून्हा काळानंतर काही वर्षांनी ऊर (ह्रदय), मेंदू, मणका, शस्त्रक्रियेने रिॲक्टिव्ह करावं लागू नये म्हणजे झालं. उद्याच्या कामांची यादी करत झोपी जाणारा व आज महत्त्वाचं काय काम आहे ? याची यादी करतच जागा होणारा हल्लीचा प्रत्येक मानव म्हणूनच तो 'यादी मानव'.

दिवसभराच्या हजार कामांमध्ये १ जानेवारी पासून नवं काहीतरी काम वाढवून घेण्याची, नवनवे संकल्प करण्याची व नाहीच जमले तर मोडण्याची यादी मानवाला भारीच हौस. ओरबाडता येईल तेवढा पैसा, कमावता येईल तेवढे नाव, तारेवरच्या कसरतीत सांभाळता येतील तेवढी नाती. ही सर्वसाधारण यादीमानवाची लक्षणे आहेत. पूर्णपणे उजाडल्यावर मगच गुहेबाहेर पडणारा आदिमानव - त्याला कुठलं थर्टीफर्स्ट आणि कसलं सेलिब्रेशन ? काही नव्हतं सारे दिवस सारखेच. पण उजाडेपर्यंत धीर न निघणारे, ३१ डिसें. च्या रात्री ११-५५ पासूनच नव्या वर्षाचे स्वागत करु लागतात. एवढी काय घाई ? तर स्पर्धेचं युग. तुझ्या आधी मी. चढाओढ. जगभरातले सर्व यादिमानव असंच करतात. आपल्याकडे होळीला रात्री बोंबा मारण्याची मुभा असते. पण साऱ्या जगात ३१ डिसें. च्या रात्री घड्याळात दोन्ही काटे १२ वर गेले रे गेले की बोंबा बोंब, शिट्या, आरोळ्या, फटाके, ढोल, ताशे, शुभेच्छा, हस्तांदोलन, मिठ्यांदोलन, फोन, सेलफोन, सर्व चालू. त्यानिमित्ताने किमान ५-६ आठवडे आधीच ठरवलेली सेलिब्रेशनं, कुणी पंचतारांकित, कुणी गच्चीवर, बागेत, मैदानात, चौपाट्या, हॉटेल, रिसॉर्ट सर्व फुल्ल, मश्गुल, धुंद. ओल्या पार्ट्या करणाऱ्यांना तर थर्टी फर्स्ट व गटारी हे दोन दिवस म्हणजे 'नशासिद्ध' हक्काचे वाटतात. आम आदमी यादीमानव बिचारे गर्दी व आवाजाला कंटाळून, घरीच उसळ-पाव, पावभाजी, पिझ्झा वगैरे करून सेलिब्रेट करतात. मुंबईत तर २९ डिसें.च्या संध्याकाळपासूनच बेकऱ्यांमधून पाव गायब होऊ लागतात. सामान्यांना पाव पाव करत हिंडावं लागतं. नाहीतर बेत तरी बदलावा लागतो. मग करतायत शंख गृहिणी त्या बेकरीवाल्यांच्या नावानं, लाटतायत बिचाऱ्या पुऱ्या नाहीतर पोळ्या. नाहीतर टाकून देतात फोडणीस मुगाच्या डाळी खिचडी. पटकन करणार काय आयत्या वेळी ? त्यांनाही टी.व्ही वरील सर्व तथाकथित मनोरंजनाचे कार्यक्रम पहायचे असतात. चॅनेल्स कितीही बदलली तरी किंवा कितीही 'ब्रेक' सहन केले तरी, मागील १०-१५ वर्षांत एकही धड, निखळ मनोरंजनाचा कार्यक्रम ३१ ला निदान मी तरी पाहिला नाही. खाण्यापिण्याची चंगळ व टी.व्ही वरील दंगल पहात सामान्य यादीमानवाचं कुटुंब त्यातल्यात्यात समाधान मानतं. निदान काही तास तरी सारं विसरतात मग २ जाने. पासून आहेच की, ६ सिलेंडरचं टेन्शन. भ्रष्टाचाऱ्यांना शिव्या, अतिरेकी, दंगलखोरांना शाप, आणि गर्दी, रांगा यांचे व्याप. साडेबारा, पाऊण पर्यंत फटाके वाजवणारे दमले की, सारे जण उबदार दुलईत शिरतात. कायमच उन्हाळा असलेल्या मुंबईसारख्या मोठ्या शहरात आईस्क्रीम खाऊन कृत्रिम थंड झालेला यादीमानव, उद्याच्या कामात व्यत्यय नको म्हणून उरलेले तास तरी राहिलेली झोप काढायला जातो. पण छे, झोप कुठली येतेय ? येणारे नव वर्ष ढालीसारखं समोर दिसत असतं. या वर्षी तरी आवक वाढू दे. ओढाताण थांबू दे. अशी मनात देवाला प्रार्थना करतच झोपेची याचना करू लागतो.

## प्रेम

सौ. प्रिती भिडे

तुझ्या माझ्यामध्ये जे होतं घडलं
आपल्याला भेटवावं असं दैवाला का वाटलं ?
तूच सांग तेंव्हा तुलाही होतं पटलं
पण तरीही तू मला म्हणलं नाहीस आपलं

हृदयाची माझ्या व्यथा तेंव्हा तू जाणलीस,
जीवनातील पोकळी भरून तू काढलीस,
तू कधी दूर जाशील असं खरंच नव्हतं वाटलं
पण तरीही तू मला म्हटलं नाहीस आपलं . . . .

हात घेतलास हातात, व्यक्त केल्यास भावना,
असा सोडून जाशील याची नव्हती कल्पना,
सांग ना ! प्रेम केलं ह्यात माझं काय चुकलं ?
पण तरीही तू मला म्हटलं नाहीस आपलं

तू पाठ फिरवलीस, मी झुरत गेले,
रडून रडून डोळ्यांचे रिते झाले प्याले,
प्रेम करून धोका देताना काहीच नाही वाटलं ?
आणि तरीही तू मला म्हटलं नाहीस आपलं . . . .

हृदयातले प्रेम आता खोल खोल गाडीन,
स्वप्न तुझे साकार होताना दुरूनच पाहीन,

## अपूर्ण

क्षणभंगूर हे जग, नाही काही भरवसा
नर कसा झाला स्वार्थी खाल्या घरी मोजे वासा

देव सुद्धा मिटे डोळे त्याला प्रिय पापीजन
पुण्यवान रे उपाशी, पाप्या मिष्टान्न भोजन

कुणा घडे अपघात देई कुणा तू कॅन्सर
शाश्वत जे जे भासे ते निघे क्षणभंगुर

अशा अशाश्वत जगात भविष्य कोणी पाहिले
करू करू म्हणताना सर्व अपूर्ण राहिले

## 'आम्ही भिडे' जाहिरात दरपत्रक

१) त्रैमासिक/वार्षिक पूर्ण पान साधे (ब्लॅक अॅन्ड व्हाइट) - - रु.२,०००/-
२) त्रैमासिक/वार्षिक अर्धेपान साधे (ब्लॅक अॅन्ड व्हाइट) - रु.१,०००/-
३) त्रैमासिक/वार्षिक पाव पान साधे (ब्लॅक अॅन्ड व्हाइट) - - - रु.५००/-
४) त्रैमासिक/वार्षिक शुभेच्छा पट्टी ब्लॅक अॅन्ड व्हाइट- - - - - रु.५००/-
५) वार्षिक अंक प्रायोजकत्व - - - - - - - - - - - - - - - रु. ३०,०००/-
६) त्रैमासिक अंक प्रायोजकत्व - - - - - - - - - - - - - रु. ८,०००/-

## विसरू नको ! सौ. प्रिती भिडे

विसरू नको श्वासात तुझ्या एक श्वास मिसळला आहे
अंग प्रत्यंगात माझ्या जीवन बनून राहिला आहे
विसरू नको तुझ्या सुरात आणखी एक स्वर मिसळला आहे
जीवन गाण्यात तुझ्या माझी सतत साथ आहे
विसरू नको तुझ्या हृदयात माझे हृदय धडकत आहे
जोवर तुझी साथ आहे, मी श्वास घेत आहे
विसरू नको मी तुझी अर्धांगिनी आहे
कायद्याचं सोड पण धर्माने तुझी पत्नी आहे
विसरू नको माझे सर्वस्व तुझेच आहे
तुझ्या बरोबर आयुष्य मला जगायचे आहे
विसरू नको जोडी तुझी माझी दैवानेच घडविली आहे
तुझ्या मांडीवर मरण यावं हीच शेवटची इच्छा आहे

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२७

## आवाहन

९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील १०० रु. चा सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केलेला आहे. त्यामुळे
आश्रयदाता - रु. १०,०००/-
हितचिंतक रु. ५,०००/-
आजीव सभासद रु. १,०००/-
हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. तसेच या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्या अनुषंगे खालील निर्णय घेण्यात आला. ''जे सभासद १०० रुपये भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घ्यावे.'' अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घेण्यावे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे याची नोंद घ्यावी.

## श्रद्धांजली

भिडे कुलातील खालील व्यक्तींना देवाज्ञा झाली, ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो ही प्रार्थना !

१) कै. दत्तात्रय वामन भिडे, पुणे.
२) श्रीमती प्रभा प्रमोद भिडे, पुणे.
३) कै. वसंत रामकृष्ण भिडे, पुणे.
४) कै. वामन शंकर भिडे, पुणे.

## परमेश्वर ! सौ. प्रिती भिडे मो. ९९२२९४४०८२

का असा अज्ञ तू, का असा अव्यक्त तू,
का असा निर्गुण तू, का निराकार तू ?
का असे सुखात तू कि दुःखात तू,
असशी हास्यात तू कि अश्रूत तू ?
असशी धरणीत तू कि गगनात तू,
असशी दवबिंदूत तू कि सागरात तू ?
असशी दगडात तू नि नदीतल्या जळात तू,
तूच देवळात नि भयाण स्मशानात तू,
असशी मृत्यूत तू नि असशी जन्मात तू,
असशी कधी रुद्र तू कधी असे सौम्य तू,
कधी करुणाकर तू कधी असे निष्ठूर तू.
मातीच्या कणात तू तरी सर्वव्यापी तू.
सृष्टी संहारात तू नि सृजनामधेही तू
दुष्टांच्या हिंसेत तू मातेच्या ममतेत तू,
वाळूचा कणही तू नि शेतातील पीक तू.
रवीचा दाह तूच नि हिमाचा वर्षाव तू.
ज्वालामुखी हि तूच नि शांत जलाशय तू
पृथ्वीच्या उदरात तू नि गगनाच्या पदरात तू.
तूच असशी व्याधी नि औषधही असशी तू.
असशी वृधत्वात तू नि बालत्यातही तूच तू.
असशी प्रणयात तू नि निर्घृण क्रौर्यात तू
असशी शब्दातीत तू नि असशी गुणातीत तू
मज मनीच्या भावना नि तरंग हि आहेस तू
हा प्रयत्न तुज जाणण्याचा तोहि आहे तूच तू
काही उणे राहिले तरी ती पोकळी तूच तू

प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल वजीर RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)